महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
CIN of The Corporation
U92100MH1977SGC019882
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.
दुरध्वनी क्र. २८४० १५४४, २८४० १७५५, २८४९ ७५०० फॅक्स : २८४० ०७३४

क्र. दाफाचि/कलागारे-२०२०/०१/६३३
दि. १५.०१.२०२१

# परिपत्रक

**विषय :- चित्रनगरी परिसरातील कथाबाहय कार्यक्रमाचे चित्रीकरणासाठी प्रेक्षागारात प्रेक्षकांस (Audience) परवानगी देण्याबाबत.**

**संदर्भ** :- १. फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया आणि सिने इम्प्लॉइज यांचे दि. ५.१.२०२१ चे पत्र.

२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.६५/सां.का.१, दि.४.११.२०२० आणि क्र.संकीर्ण ८०२०/प्र.क्र.२११/सां.का.१, दि.५.११.२०२०

३. परिपत्रक क्र.दाफाचि २०२०/कलागारे/०१/मासू/५४६, दि.९.९.२०२०

४. शासन निर्णय,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई, क्र. कोचिन २०२०/प्र.क्र.३७/सां.का.१, दि.३०.५.२०२० व दि.२३.६.२०२०

कोरोना विषाणूच्या (कोव्हिड-१९) पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे तसेच कमी टिआरपी मुळे निर्माती संस्थांचे तसेच चॅनेलचे आर्थिक नुकसान झाले आहे. टिआरपी वाढविण्यासाठी तसेच अनेक बेरोजगारांना/मजूरांना काम मिळण्यासाठी कथाबाहय कार्यक्रमांचे चित्रीकरण करताना प्रेक्षकांना प्रवेश देण्यास परवानगी देण्याची विनंती सं.क्र.१ येथे नमूद फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया आणि सिने इम्प्लॉइज तसेच अन्य निर्मितीसंस्थेकडून होत आहे.

कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १६.३.२०२० अन्वये जारी केलेल्या नोटीसीनुसार तसेच शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार चित्रनगरीत चित्रीकरण बंद करण्यात आले होते. शासनाच्या दिनांक ३०.५.२०२० चा शासन निर्णय व त्या सोबतच्या मार्गदर्शक तत्वांचे अधीन राहून नियंत्रित स्वरुपात दिनांक १५.६.२०२० पासून चित्रीकरण सुरु करण्यास परवानगी देण्यात आली. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सुरक्षिततेच्यादृष्टीने जमावावर नियंत्रण राहण्यासाठी कथा व कथाबाहय कार्यक्रमाचे चित्रीकरण करण्यासाठी प्रेक्षकवर्गास निर्बंध घातले आहेत.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीस खीळ बसल्याने, उदयोगधंदयांना चालना देण्यासाठी विविध उदयोग सुरु करण्यावरील घालण्यात आलेले निर्बंध शासनाकडून "Mission Begin Again" अंतर्गत टप्प्याटप्याने शिथिल करण्यात येत आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. २ येथे नमूद दि.४.११.२०२० आणि दि.५.११.२०२० च्या शासन निर्णयान्वये चित्रपटगृहे व नाटयगृहे सुरु करण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली आहे. सदर मार्गदर्शक तत्वांनुसार चित्रनगरीत कथाबाहय कार्यक्रमांचे चित्रीकरण करण्यासाठी प्रेक्षागारात संपूर्ण आसन क्षमतेच्या ५०% पेक्षा अधिक प्रेक्षकवर्ग राहणार नाही या अटीच्या तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून प्रेक्षकवर्गास (Audience)परवानगी देण्यात येत आहे. प्रेक्षागारामधील आसन व्यवस्था ही सोबतच्या आदर्श आसन व्यवस्थेच्या नमुन्याप्रमाणे पर्याप्त सुरक्षित अंतर राखले जाईल अशा प्रकारे केली असली पाहिजे.

(स्थळ प्रतिवर मा. व्यवस्थापकीय संचालिका यांची स्वाक्षरी असे.)

(आंचल गोयल (भा.प्र.से.)
सह व्यवस्थापकीय संचालक

प्रति - सर्व निर्मिती संस्था

Audience In below format

